# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महापालिकेत जानेवारी महिन्यातील पहिल्या सोमवारी लोकशाही दिन संपन्न**

नागरिकांचे प्रश्न आणि समस्या सोडविण्यासाठी शासकीय कार्यालयात लोकशाही दिन राबविण्यात येतो. मिरा भाईंदर महानगरपालिकेत दिनांक ०६ जानेवारी २०२५ रोजी लोकशाही दिन पार पडला. या लोकशाही दिनात नागरिकांच्या आलेल्या तक्रारी आणि समस्या जलद गतीने सोडविण्यासाठी विशेष पावले उचलली जाणार आहेत.

नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी, शासकीय यंत्रणेकडून प्रभावी उपाययोजना म्हणून लोकशाही दिन राबविला जातो. शासनाच्या परिपत्रकानुसार जिल्हास्तरीय तसेच महापालिका स्तरीय हा लोकशाही दिन राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने प्रत्येक महिन्याचा पहिला सोमवार लोकशाही दिनासाठी राखीव ठेवला आहे. ०६ जानेवारी २०२५ रोजी झालेल्या लोकशाही दिनात आलेल्या तक्रारीबाबत मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी तक्रारदारांचा विषय समजून त्यावर उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. येणाऱ्या फेब्रुवारी महिन्यातील पहिल्या सोमवारी लोकशाही दिवस पार पडणार असून नागरिकांनी त्यांच्या तक्रारीसह मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालयात उपस्थित राहण्याचे आवाहन महानगरपालिका प्रशासनामार्फत करण्यात येत आहे. आज लोकशाही दिनानिमित्त अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त (मुख्यालय) कल्पिता पिंपळे, उपायुक्त प्रसाद शिंगटे, उपायुक्त डॉ. सचिन बांगर, नगरसचिव वासुदेव शिरवळकर, शहर अभियंता दिपक खांबित, मुख्यलेखाधिकारी व वित्त अधिकारी कालिदास जाधव, सहाय्यक संचालक नगररचना पुरुषोत्तम शिंदे, मुख्यलेखापरीक्षक सुधीर नाकाडी, कार्यकारी अभियंता नितीन मुकणे, सिस्टम मॅनेजर राज घरत, सहाय्यक आयुक्त सामान्य प्रशासन सुनिल यादव, सामान्य प्रशासन विभाग अधिकारी जितेंद्र कांबळे व वाहतूक पोलीस सयाजी मोहिते उपस्थित होते.